दुरध्वनी क्र. ०२२– २६८५६५४२
फॅक्स क्र. ०२२ – २६८५६१२०
cmdt.srpf8.mumbai@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते
महारा ट्र ासन,
समादेशक,राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.८,
मुंबई – ४०००६५

क्र. आशा/प्रलि/गट–8/पो.भ. 2022–23/लेखी परिक्षा /१८६५/2024,मुंबई, दि.०६/08/2024

# राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 8, मुंबई.

## सशस्त्र पोलीस शिपाई – 2022–23

## लेखी परीक्षा

## –: उमेदवारांना सुचनाः–

1)राज्य राखीव पोलीस बल गट क्र.8 मुंबई या आस्थापनेवर सन 2022–23 मधील सशस्त्र पोलीस शिपाई पदांची लेखी परिक्षा दि. 14/08/2024 रोजी खालील ठिकाणी व वेळी आयोजित करण्यात आलेली आहे. दि.01/08/2024 रोजी लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांची अंतिम यादी www.mahapolice.gov.in, maharashtrasrpf.gov.in व महाआयटीच्या संकेतस्थळावर दि.01/08/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

| लेखी परिक्षा केंद्रचे ठिकाण | दिनांक व वेळ | लेखी परिक्षा केंद्र किंवा ठिकाणापर्यंत पोहचण्याकरिता ऑनलाईन लिंक व बारकोड स्कॅनर ( **Scanner** ) सह |
|---|---|---|
| लोढा इंडस्ट्रियल ॲन्ड लॉजेस्टिक पार्क फेज–2, पलावा, नाऱ्हेण–उसाटने, तळोजा बायपास रोड, कल्याण– (पुर्व), ठाणे 421204. | दिनांक 14/08/2024 रोजी दुपारी 14:00 ते 15:30 वा.पर्यंत | https://maps.app.goo.gl/XAGQhUZRXLCsnsvW6 |

| नजिकचे बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन व येण्याजाण्याचा मार्गाची माहिती व परिक्षा केंद्र जवळील बस स्टॉप |
|---|
| 1. कल्याण जंक्शन, रेल्वे स्टेशन( पुर्व )/पनवेल रेल्वे स्टेशन /डोंबिवली रेल्वे स्टेशन ( पुर्व ) |
| 2. कल्याण बस स्टॅन्ड **: बस स्टॉप – नाऱ्हेण फाटा (मार्गे खोनी – तळोजा बायपास रोड )** |
| 3. पनवेल बस स्टॅन्ड /वाशी बस स्टॅन्ड **: बस स्टॉप – नाऱ्हेण फाटा (मार्गे नाव्हडे फाटा – तळोजा बायपास रोड )** |

2) सर्व उमेदवारांनी लेखी परिक्षेकरीता महाआयटी कडुन अदा केलेल्या प्रवेश पत्रात नमुद दिनांकास परिक्षा केंद्रावर सकाळी ठिक 09:30 वाजेपर्यंत हजर राहावे.

3) मुख्य प्रवेशव्दारतुन सकाळी 09:30 वाजता प्रवेश दिला जाणार आहे. लेखी परिक्षा सुरू झाल्यानंतर कोणत्याही उमेदवारांस परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

4) लेखी परिक्षेच्या प्रवेशपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. परिक्षा केंद्रावर आलेल्या उमेदवाराने पर्यवेक्षकांसमोर हजेरी पटावर फोटो लावुन स्वाक्षरी करावी.

5) उमेदवारांनी स्वतःची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेल्या आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट, महाविदयालयीन ओळखपत्र, वाहनपरवाना यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र व लेखी परिक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र ( हॉल तिकिट) तसेच दोन फोटो सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

6) उमेदवारांना सदर लेखी परिक्षेकरिता या कार्यालयाकडुन काळे पेन व पॅड पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सोबत येतांना इतर अनावश्यक वस्तु आणु नये, आणल्यास सदरच्या वस्तु परिक्षा केंद्राच्या बाहेर ठेवण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील.

7) उमेदवारांस परिक्षा वर्गावर मोबाईल, घडयाळ, ब्लुटुथ, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅक्ल्युलेटर, नोटपॅड, नोटबुक, तसेच बटण कॅमेरा, पेन कॅमेरा यासारखी इतर इलेक्ट्रानिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वतःजवळ बाळगणेस पुर्णतः मनाई आहे. अशा वस्तु आढळल्यास उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाद ठरवुन त्यांची उमेदवारी रदद् करण्याबरोबर गुन्हा दाखल करण्यात येईल.

8) एखादा उमेदवार लेखी परिक्षेस गैरहजर राहिल्यास, त्याला पुन्हा लेखी परिक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

9) उमेदवार भरती प्रक्रियेमध्ये उध्दट, गैरवर्तन, अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याच्या, कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतुन बाद करून त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.

10) उमेदवार अथवा त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट / दलाल , अधिकारी / कर्मचारी यांच्या भुलथापांना / अमिशाला बळी पडु नये, उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

सशस्त्र पोलीस शिपाई पदांच्या लेखी परिक्षेकरिता पात्र उमेदवारांची यादी, लेखी परिक्षेची तारीख, वेळ च ठिकाण याबाबतची माहीती राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाच्या संकेतस्थळावर maharashtrasrpf.gov.in मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in व महाआयटी विभागाचे policerecruitment2024.mahait.org या तिन्ही संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- 06 / 08 / 2024

( मोक्षदा पाटील ) भापोसे
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. 8, मुंबई.

प्रत सविनय सादर,

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ( **लक्षवेध – संगणक कक्ष** )

2/– राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.8, गोरेगांव, मुंबई येथील सन 2022–23 पोलीस भरतीमधील लेखी परिक्षेकरिता अंतिम यादी महा आय टी च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

प्रत सविनय सादर,

मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मा. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे परिक्षेत्र, पुणे

प्रत माहीती व संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरिता,

मा. व्यवस्थापक, महा आयटी, महाराष्ट्र राज्य, मुंबई

2/– राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.8, गोरेगांव, मुंबई येथील सन 2022–23 पोलीस भरतीमधील लेखी परिक्षेकरिता अंतिम यादी महा आय टी च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

3/– तसेच लेखी परिक्षेकरिता येणा–या उमेदवार यांना हॉलतिकिट वाटप करून त्यांना परिक्षा केंद्र येथे जाण्याकरिता संदेश (SMS) सोबत त्यांना परिक्षा केंद्र ठिकाणापर्यंत पोहचण्याकरिता ऑनलाईन लिंक व बारकोड स्कॅनर ( Scanner ) पाठविण्यात यावे ही विनंती.